# विभागीय आयुक्त कार्यालय
## (विधान भवन) पुणे विभाग, पुणे
### (सामान्य प्रशासन शाखा)

दुरध्वनी क्र. ०२०-२६३६१०६८ | वेबसाईड- www.divcompune.in
फॅक्स क्र. ०२०-२६३४३२३३ | ई मेल-gb.divcompune@gmail.com


क्र.२०१९/सा.प्र-४/शि.प मतदार/ नोंदणी कार्यक्रम /कावि/[illegible]/२०१९ दिनांक [illegible]/१०/२०१९

प्रति,

१. जिल्हाधिकारी, पुणे / सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर
२. कुलसचिव, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापिठ, गणेशखिंड, पुणे
३. कुलसचिव, शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर
४. कुलसचिव, पुण्यश्लोक, आहिल्याबाई होळकर विद्यापिठ, सोलापूर
५. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापिठ, पुणे
६. कुलसचिव, भारती विद्यापिठ, पुणे
६. सह संचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे
७. सह संचालक, उच्च शिक्षण विभाग पुणे
८. उप संचालक, शिक्षण विभाग पुणे.
९. कुलसचिव, कृषि महाविद्यालय पुणे

विषय :- पुणे विभाग शिक्षक मतदार संघात मतदार नोंदणी कार्यक्रमाबाबत.
अधिसूचना प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ :- १. मा.भारत निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र.३७/एलसी/एलईटी/ईसीआय/एफयूएनसी /ईआरडी/ईआर/२०१९/२ दिनांक ३१ जुलै २०१९
२. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.ईएलआर-२०१९/प्र.क्र१२१/१९/३३ दि. १ ऑगस्ट २०१९

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली यांनी दिनांक १/११/२०१९ या अर्हतादिनांकावर आधारित पुणे विभाग, शिक्षक मतदार संघ निवडणूकीच्या अनुषंगाने मतदार नोंदणीचा कार्यक्रम घोषित केला आहे. प्रस्तुत कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिनांक १/११/२०१९ पासून खालील अर्हता धारण करीत असलेल्या व्यक्तींना विहित नमुना १९ मध्ये नाव नोंदणी करिता अर्ज करता येईल व अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक ६/११/२०१९ असा आहे.

1. अर्हता :- जी व्यक्ती भारताची नागरीक आहे, आणि त्या मतदार संघातील सर्वसाधारण रहिवासी आहे आणि 1 नोव्हेंबर, 2019 च्या लगत पूर्वीच्या सहा वर्षामध्ये किमान तीन वर्ष इतक्या एकूण कालावधीकरिता माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची अशी विनिर्दिष्ट केलेली नसेल अशा, राज्यातील कोणत्याही शिक्षक संस्थेमध्ये अध्यापन करीत आहे अशी प्रत्येक व्यक्ती,

2. एखादया व्यक्तीने ज्या दिनांकारा अर्ज केला असेल त्यावेळी ती अध्यापनाचे काम करीत नसेल अशा व्यक्तीच्या बाबतीत तीने शेवटी ज्या संस्थेत काम केले आहे त्या संस्था प्रमुखाकडून प्रमाणपत्र स्वाक्षरीत करुन घेतील.

3. एकत्रितपणे आलेले अर्ज, मग ते व्यक्तीशः सादर करण्यात आले असोत किंवा टपालाद्वारे सादर करण्यात आलेले असोत, अशा अर्जांवर नाव समाविष्ट करणेसाठी मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून विचार केला जाणार नाही. तथापि, संस्था प्रमुखांना आपल्या सर्व कर्मचारी यांचे अर्ज एकत्रितपणे पाठविता येतील, कुटुंबातील एका सदस्यास त्याच कुटुंबातील दुसऱ्या सदस्याचा नमुना 19 मधील सादर करता येईल आणि प्रत्येक सदस्याच्या संबंधातील मूळ प्रमाणपत्र सादर करुन प्रमाणपत्र सत्यपित करुन घेता येईल.

4. कोणतीही व्यक्ती जी गोष्ट खोटी असून ती खोटी असल्याचे एकतर तीला ज्ञात असेल किंवा तर ती समजत असेल किंवा जी खरी असल्याचे ती समजत नसेल त्या गोष्टीबाबत अर्जात एखादे निवेदन किंवा अभिकथन करील ती, लोकप्रतिनीधीत्व अधिनियम 1950 च्या कलम 31 अन्वये शिक्षेस पात्र असेल, याची नोंद घ्यावी.

नमुना १९ मधील छापील अर्ज मतदार नोंदणी अधिकारी / सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी पदनिर्देशीत अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मिळविता येतील. हस्तलिखित, टंकलिखित, सायक्लोस्टाईल किंवा खाजगीरित्या छापलेले नमुने देखील स्वीकारले जातील.

त्याअनुषंगाने पुणे शिक्षक मतदार संघाचे मतदार यादीत, आपले अधिनस्त असलेल्या सर्व विद्यालयातील / महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांची मतदार नोंदणी होणे करिता पुणे विभागातील सर्व विद्यालयांचे व महाविद्यालयाचे प्राचार्य यांना आपले मार्फत कळविणे कामी आपणास कळविण्यात येत आहे.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती शासनाची वेबसाईट www.eci.gov.in यावर उपलब्ध आहे.

(डॉ. दिपक म्हैसेकर)
मतदार नोंदणी अधिकारी
शिक्षक व पदवीधर संघ, तथा
विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE :0231-2609089,2609136 & 2609146**
**शिवाजी विद्यापीठ,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर-४१६ ००४. महाराष्ट्र**
**दूरध्वनी-०२३१-२६०९०८९,२६०९१३६ व २६०९१४६**
Website : www.unishivaji.ac.in e-mail : www.affiliationt1@unishivaji.ac.in
Estd:1962
NAAC 'A' Grade

शिवाजी वि./संलग्नता टी.१/ प्रशांत/ No 0641 दिनांक 24 OCT 2019

प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये व शिक्षण संस्था तसेच सर्व विद्यापीठ अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

आपला विश्वासू,

डॉ. व्ही.डी.नांदवडेकर

कुलसचिव